SATIMATA SHIKSHAN SANSTHA'S

# DR. M. K. UMATHE COLLEGE

APPROVED BY GOV.T OF MAHARASHTRA & AFFILIATED TO RTM NAGPUR UNIVERSITY

Reaccredited by NAAC with B++

Lokseva Nagar, Bhamti, Ring Road, Nagpur - 440 022.
Ph. No. 0712 2227062, Fax : 0712 2230460 | mku_rmc@yahoo.co.in, umathecollege@gmail.com | Website : www.umathecollege.org

**Shri Kishor Umathe**
Secretary

**Dr. D. V. Naik**
Principal

Ref. No. MKU

Date : ..............................

## 'मालती करंडक'

## आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचे थाटात उद्घाटन

सतीमाता शिक्षण संस्था नागपूर द्वारा संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा स्व. मालतीताई उमाठे यांच्या 85 व्या जयंती प्रित्यर्थ डॉ. एम.के. उमाठे कॉलेज नागपूरच्या वतीने आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. दिनांक 27.08.2019 ला सकाळी 10.00 वा. श्री अरूण नलावडे, प्रसिद्ध मराठी सिनेअभीनेता, मुंबई यांच्या हस्ते द्विप प्रज्वलीत करून उद्‌घाटन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव श्री किशोरभाऊ उमाठे होते. याप्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून प्रसिध्द समाज सेवक डॉ. कन्ना मडावी, अहेरी, जि. गडचिरोली, डॉ. समता मडावी तसेच श्रीमती मदाताई उमाठे, अध्यक्षा सतीमाता शिक्षण संस्था, विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डि.व्ही. नाईक, स्पर्धेचे परिक्षक म्हणून डॉ. प्रविण पारधी, श्री किशोरभाऊ आयलवार आणि श्री राज कुबेर मंचावर उपस्थित होते.

यावर्षीपासून स्व. डॉ. मालतीताई उमाठे यांच्या स्मृति प्रित्यर्थ सुरू करण्यात आलेल्या 'जीवनगौरव पुरस्काराने' श्री अरूण नलावडे व डॉ. कन्ना मडावी यांना संस्थेचे सचिव श्री किशोरभाऊ उमाठे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

आपल्या उद्‌घाटनपर भाषणात श्री अरूण नलावडे म्हणाले की, मी ही एकांकिका स्पर्धेतुनच वाढलो, कलावंताना फक्त शिकुन अभिनय येत नाही, तर कृतीत आणावे लागते. त्यांनी स्पर्धकांना निरिक्षण करा, मित्रा सोबत बोला, विविध स्पर्धा बघा, चुका टाळा, नाटकाचे उद्‌घाटन करा पण समारोप करू नका म्हणजे स्पर्धा जिवंत राहिल असे सांगितले. कारण अभिनय प्रत्येक व्यक्तीमध्ये असतो. गेल्या आठ वर्षापासून संस्थेद्वारा सातत्याने सुरू असलेल्या या स्पर्धेचे कौतुक केले व नवोदित कलाकारांना या संधीचा फायदा घेण्याचे आव्हान करून स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

Scanned by CamScanner

प्रसिद्ध समाज सेवक डॉ. कन्ना मडावी यांनी आपल्या प्रमुख भाषणात सांगितले की, मी वीस वर्षांपासून वैद्यकीय क्षेत्रात वंचित व गरजुंची सेवा करतो आहे. पुरस्कार माणसाला विचलीत करतात. पुरस्काराने माणूस मोठा होत नाही तर, कामाने मनुष्य मोठा होतो. स्पर्धकांनी निर्मळ व प्रामाणिक असणे गरजेचे आहे. कारण अंधारात शुक्रतारा दिसतो, ताऱ्याकडे बघितले तर प्रकाश दिसतो आणि अंधाराकडे बघितले तर अंधार दिसतो. आपला मार्ग आपल्यालाच निवडायचा आहे असे सांगुन संस्थेने चालविलेल्या या स्पर्धेचे मनापासून अभिनंदन केले व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्यात.

विशेष अतिथी डॉ. समता मडावी प्रसिद्ध समाजसेविका यांनी आपल्या भाषणातून स्पर्धकांना क्रियाशिल गोष्टींकडे लक्ष देण्यास सांगितले. देशातील प्रत्येक व्यक्तीने स्वतःप्रत प्रामाणिक राहिले तर कोणालाही समाजसेवा करण्याची गरज राहणार नाही असे सांगुन स्पर्धकांना शुभेच्छा दिल्यात.

आपल्या अध्यक्षीय भाषणात संस्थेचे सचिव श्री किशोरभाऊ उमाठे म्हणाले की, या स्पर्धेच्या माध्यमातून वैदर्भिय उद्योन्मुख नटांना संधी उपलब्ध करून देणे हा एकमेव उद्देश ठेवून संस्था गेल्या आठ वर्षापासून निरवार्थपणे स्पर्धेचे आयोजन करित आहे असे सांगुन स्पर्धकांना शुभेच्छा दिल्यात.

कार्यक्रमाची सुरूवात महाविद्यालाची विद्यार्थीनी कु. शर्वरी नाईक हिच्या स्वागत गीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. डि.व्ही. नाईक यांनी तर कार्यक्रमाचे संचालन श्रीमती प्रा. मीणा मोरोणे व आभार प्रा. विनोद खेडकर यांनी केले.

उद्घाटन सत्र संपल्यानंतर लगेच एकांकिका स्पर्धेला सुरुवात झाली. सर्वप्रथम श्री अरूण नलावडे यांच्या हस्ते ईश्वर चिठ्ठीने स्पर्धेतील चमुचे 06 लॉट्स पाडण्यात आले. प्रथम एकांकिका सादर करण्याचा मान डॉ. एम.के. कॉलेजच्या विद्यार्थ्यांना मिळाला. त्यांनी लपंडाव ही एकांकिका सादर केली. त्यानंतर श्री वसंत शिक्षण महाविद्यालय नागपूर – अतिथी, रामाजी पांडव कॉलेज, नागपूर – पिकनिक, महिला महाविद्यालय नंदनवन, नागपूर – धुशी, ललित कला विभाग, रातुम, नागपूर – दर्दपोरा, धनवटे नॅशनल कॉलेज – गटार इत्यादी एकांकिका अनुक्रमे सादर करण्यात आल्या.

संध्याकाळी 8.00 वाजता स्पर्धेचा समारोप करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून मा. श्रीमती मंदाताई उमाठे या उपस्थित होत्या. तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रसिद्ध सिने अभिनेता श्री जयंत गाडेकर उपस्थित होते. याप्रसंगी श्री जयंत गाडेकर यांनी मनोगत व्यक्त करून स्पर्धकांना नाविन्यपूर्ण एकांकिका सादर कराव्यात व जास्तीत–जास्त साहित्याचे वाचन व आकलन कराणे आवश्यक आहे असे सांगितले. तर अध्यक्षीय समारोपामध्ये श्रीमती मंदाताई उमाठे यांनी स्पर्धकांनी नागपूरचे नाव राष्ट्रीय पातळीवर कशा पद्धतीने नेता येईल याचा विचार करावा असे म्हटले. या. प्रसंगी प्रथम, द्वितीय व तृतिय एकांकिका आलेल्या स्पर्धकांना गौरविण्यात आले. धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूरच्या 'गटार' एकांकिकेला विजेता म्हणून घोषीत करण्यात आले.

समारोपिय कार्यक्रमाचे संचालन व आभार डॉ. वैशाली मेश्राम यांनी केले. ही एकांकिका यशस्वीरित्या पार पाड्यात महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. डी.व्ही. नाईक, डॉ. राजेंद्र सेलुकर, प्रा. विनोद खेडकर तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची मोलाची भूमिका लाभली.

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe Colle
Nagpur - 440022

Scanned by CamScanner